**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.३ चा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री ए.एन.अनसारवाडेकर यांचे मार्फत सुरुः–**

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,

माझे नावः – अरविंद राम व्यंजने,

वय – ५८ वर्षे, व्यवसाय– शेती,

राहणार – रा.बोरसुरी, ता. निलंगा जि. लातूर.

दि.१४/०८/२०२२ रोजी कासारसिरसी पोलीसांनी मला मदनसुरी येथे माधव माने यांच्या शेतात घटनास्थळ पंचनामा करण्यासाठी बोलावले होते. तेथे सिमेंटचा पोल वाकलेल्या स्थितीत होता. वरुन तीन तारा होत्या. पाऊस पडल्यामुळे सोयाबीन पिकात काळी माती आढळून आली. उत्तर दिशेला पुर्व–पश्चिम ६० ते ६५ फुटाचा बांध होता. दक्षिण दिशेला पुर्व–पश्चिम २५ ते ३० फुटाचा बांध होता. पोलीसांनी पंचनामा केला व सहया घेतल्या. पंचनामा दाखवल्यास मी ओळखु शकतो. आता मला नि.क्र.१९ कडील घटनास्थळ पंचनामा दाखवण्यात आला. त्यावर अ.क्र.१ वर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे.

**सरतपास पुर्ण**

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री.जी.एन.इंगळे यांच्यामार्फत शपथेवर सुरुः–**

०२. माझे शिक्षण दहावी पर्यंत मौजे बोरसुरी येथे झालेले आहे. निलंगा ते कासारसिरसी हे गाव १५ ते २० किलोमीटर आहे. कासारसिरसी दक्षिणेला, माझे गाव पुर्वेला व घटनास्थळ पश्चिमेला आहे. कासारसिरसी ते माझे गाव २० ते २५ किलोमीटर आहे. घटनेचे ठिकाण हे माझ्या गावापासून ३० किलोमीटर अंतरावर आहे. घटनेचे ठिकाण ते पोलीस स्टेशन हे अंतर २० ते २५ किलोमीटर

असल्याचे मला सांगता येत नाही.

०३. शुभम भंडारे, थोरमोटे व आम्ही व्यंजने एकमेकास नातेवाईक आहोत. घटनास्थळी पिक जळाल्याचे दिसुन आले. घटनास्थळावरील माधव माने यांच्या शेतात असलेल्या खांबाच्या पश्चिमेला कोणाचे व किती सर्वे नंबरचे शेत आहे हे मला सांगता येणार नाही. उत्तरेला कोणाचे शेत आहे याची मी चौकशी केली नाही. उत्तर दिशेला पुर्व–पश्चिम ६० ते ६५ फुटाचा बांध होता. दक्षिण दिशेला पुर्व–पश्चिम २५ ते ३० फुटाचा बांध होता तो बांध माधव माने व लगतच्या शेतकऱ्यांचा होता. पंचनामा जागेवर लिहला आहे, तो मला वाचून दाखवल व मग मी सही केली. उत्तर दिशेला पुर्व–पश्चिम ६० ते ६५ फुटाचा बांध होता. दक्षिण दिशेला पुर्व–पश्चिम २५ ते ३० फुटाचा बांध होता, असे पंचनाम्यात लिहलेले आहे. परंतु तो कोणाचा आहे ते लिहलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळावर कोणत्याही खाणखुणा आढळून आल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी त्यांचा नातेवाईक असल्यामुळे घरी बसुन सही केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला घटनास्थळाबाबत कोणतीही माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांच्या सांगण्यावरुन मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण** **श्रवणोत्तर स्वीकृत,**

**फेरतपास नाही.**

Digitally signed by KOMAL PRAMOD GADE
Date: 2026.08.10 17:19:45 +0530

(**श्रीमती.के.पी.गाडे**)

दिनांक–१०/०८/२०२६. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.२,

निलंगा